गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३२३ वा ● शनिवार १३ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 323 | Date : 12/04/2024 blow Saturday Page 4 Price 4

## भारताची आण्विक शस्त्रास्त्रे नष्ट करण्याचा कट, पंतप्रधान मोदींचा इंडिया आघाडीवर आरोप

नवी दिल्ली : पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या राजस्थानमधील बाडमेर-जैसलमेर या लोकसभा मतदारसंघात आज (१२ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा पार पडली. राज्यातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा मतदारसंघ असलेल्या बाडमेर-जैसलमेर मधून भाजपाने कैलाश चौधरी यांना उमेदवारी दिली आहे. चौधरी यांच्या प्राचरासाठी स्वतः पंतप्रधानांनी प्रचारसभा घेतली. या प्रचारसभेत बोलताना पंतप्रधानांनी सीमा सुरक्षा, इंडिया आघाडी आणि आण्विक शस्त्रास्त्रांवर भाष्य केलं. मोदी म्हणाले, काँग्रेस आणि इंडिया आघाडी आपल्या देशातील आण्विक शस्त्रास्त्रं नष्ट करण्याचा कट रचत आहे.



पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसच्या काळात देशाच्या सीमावर्ती भागात अजिबात विकास झाला नाही. त्यांनी जाणून-बुजून विकास केला नाही, जेणेकरून आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये लपून बसलेले आपले शत्रू या सगळ्याचा गैरफायदा घेऊन सहज आपल्या देशात यावेत. परंतु, भाजपा सरकारच्या काळात आपल्या शत्रूची इतकी हिंमत कधी झाली नाही. आपले शत्रू आपल्याकडे नजर उंच करून पाहू शकत नाहीत. आमच्यासाठी सीमेवरील गाव म्हणजे देशातलं शेवटचं गाव नाही तर ते देशातलं पहिलं गाव आहे. त्यामुळेच आम्ही सर्वात आधी आपल्या देशाच्या सीमा सुरक्षित केल्या. तसेच या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामं केली.

तुम्ही काँग्रेसचा जाहीरनामा पाहिलात तर तुमच्या लक्षात येईल की यावर मुस्लीम लीगचा प्रभाव आहे. भाजपाने आपल्या । पान २ वर'

## अवकाळी पावसाचा मुक्काम आता १५ एप्रिलपर्यंत

मुंबई : राज्यात गेल्या आठवड्याच्या अखेरपासून सुरू झालेली अवकाळी पावसाचा मारा अजूनही सुरू आहे. वादळीवाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे राज्यात मोठे नुकसान झाले असताना हवामान खात्याने अवकाळीचा मुक्काम पुन्हा वाढण्याचा इशारा दिला आहे. येत्या १५ एप्रिलपर्यंत अवकाळी पावसाचे संकट कायम राहणार आहे. दरम्यान आज शुक्रवारी पूर्व विदर्भात वादळी पाऊस आणि गारपिटीचा इशारा, तर मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

भारतीय हवामान खात्याने आज शुक्रवारीदेखील महाराष्ट्रात पावसाचा इशारा दिला आहे. येत्या २४ तासांमध्ये विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मूसळधार पावसाची वर्दी दिली आहे. आज विदर्भातील चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांना पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. तसेच बीड, लातूर, धाराशिव, सांगली, परभणी, यवतमाळ, वाशिम, छत्रपती संभाजीनगर व सोलापूरात वादळीवारा आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या जिल्ह्यात पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.तर काही ठिकाणी तूरळक पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज आहे. यादरम्यान राज्यात ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा परिसरावर १.५ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती । पान २ वर'

## महाराष्ट्रासाठी २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्यांची तरतूद

मुंबई : लोकसभा निवडणुकीकरिता मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावण्यासाठी महाराष्ट्रात सुमारे २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्या लागणार आहेत. या शाईचे वाटप जिल्हानिहाय करण्यात आले आहे.

राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघांमध्ये ९८ हजार ११४ मतदान केंद्र आहेत. प्रत्येक मतदार केंद्रासाठी प्रत्येकी २ शाईच्या बाटल्या याप्रमाणे १ लाख ९६ हजार २२८ शाईच्या बाटल्यांची संख्या होते. याशिवाय १ लाख ९६ हजार २२८ शाईच्या बाटल्यांबरोबरच १० टक्के अधिक अशा एकूण २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्या त्याचबरोबर मतदानासाठी आवश्यक ते साहित्य येत्या काही दिवसात पोहोच करण्यासाठी । पान २ वर'

## कोलकात्यातून दोघांना अटक; बंगळूरु बॉम्बस्फोटप्रकरणी 'एनआयए'ची कारवाई

नवी दिल्ली/कोलकाता: बंगळूरुमधील रामेश्र्वरम कॅफेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) शुक्रवारी पश्र्चिम बंगालमधून सूत्रधारासह दोन मुख्य संशयितांना अटक केली. या घटनेनंतर राज्यातील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि विरोधी पक्ष भाजपदरम्यान शाब्दिक युद्ध सुरू झाले.तृणमूल काँग्रेसने पश्र्चिम बंगालचे रूपांतर 'दहशतवाद्यांच्या सुरक्षित आश्रयस्थाना'त केले आहे असा आरोप भाजपने केला, तर राज्यातील पोलिसांनी तातडीने कारवाई केल्यामुळे संशयितांना अटक करण्यात आली, असे राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सांगितले. अब्दुल मतीन अहमद ताहा आणि मुस्सविर हुसैन शाजिब अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. ते कोलकात्याजवळ लपलेल्या ठिकाणाहून त्यांना पकडण्यात । पान २ वर'



## सोलापुरात मोठी घडामोडी: धर्मराज काडादी

सोलापूर/प्रतिनिधीः शेतकऱ्यांनी कामगारांसाठी मंदिरात सामान असलेल्या श्री सिद्धेश्र्वर सहकारी साखर कारखान्याचि चिमणी पाडून प्रत्यक्ष अशा हजारो लोकांचे संसार उध्वस्त केलेल्या भाजपच्या चारही मुंडीचीत करून सभासद शेतकरी कामगारांनी आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घ्यावा आणि प्रणिती शिंदे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आव्हान श्री सिद्धेश्र्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मनाथ काढावी यांनी केले सोलापूर लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या अनुषंगाने शुक्रवारी कुमठे येथील सिद्धेश्र्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर पार पडलेल्या श्री सिद्धेश्र्वर परिसरातील वीरशैव लिंगायत समाजाच्या प्रमुख मान्यवरांच्या बैठकीत काळात यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आमदार पनीती शिंदे यांच्या अंगात धमक आहे चिमणी पाडल्यानंतर लगेच या साखर कारखाने स्थळावर येऊन त्यांनी पाहणी केली व सर्व कामगारांना धीर दिला आणि शिंदे यांनी सहभागात सुद्धा कारखान्याच्या चिमणीची विषयी वेळोवेळी काढून सरकारला धारेवर धरले होते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी यात्रेच्या वेळी रस्त्याच्या प्रश्नाच्या वेळी निर्माण झालेल्या स्वतः श्री शिवकुमार शिंदे यांनी मुख्यमंत्री भेट घेऊन हा विषय मार्गी लावला आहे याची आठवण काढलेली यावेळी करून दिली आता आपण श्री सिद्धेश्र्वर सहकारी साखर कारखान्याचे सभासद असलेल्या दक्षिण । पान २ वर'



## धैर्यशील मोहिते पाटलांनी दिला भाजप पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा: भाजपचे डोकेदुखी

पंढरपूर/प्रतिनिधीः माढा लोकसभा मतदारसंघातून मोठी राजकीय घडामोडी समोर आली आहे भाजप नेते धरेशन मोहिते पाटील यांनी आज खासदार शरद पवार यांची पुण्यात भेट घेतली तर दुसरीकडे रात्री भाजप सदस्यत्वाचा आणि पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. हा भाजपसाठी पश्र्चिम महाराष्ट्रातील मोठा धक्का मानला जात आहे भाजपने लोकसभेसाठी पहिली यादी जाहीर केली या यादीतील निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केली

या उमेदवारीवरून अकलूजचे मोहिते पाटील नाराज असल्याची चर्चा सुरू होत्या यावरून काही दिवसापासून जोरदार चर्चा सुरू होत्या धैर्यशील मोहिते पाटील खासदार शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून निवडणूक लढवणार अशा चर्चा. दरम्यान काल धैर्यशील मोहिते पाटील यांनी पुण्यात शरद पवारांची भेट घेतली



व यानंतर ती राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे निश्र्चित झाले होते आता त्यांनी भाजपच्या सदस्यत वाचा राजीनामा दिला आहे बहुचर्चित म्हाडा लोकसभा मतदारसंघात भाऊ का सकाळी कडून कोण उमेदवार असणारे याची उत्सुकता कायम आहे ही जागा राष्ट्रवादीचे शरद पवार गटाकडे असलेले मागील काही दिवसापासून अनेक नावावर चाचणी करण्यात आली

ढोलकी मोहिते पाटील हे रंजीत सिंह निंबाळकर यांना उमेदवारी मिळाल्यापासून नाराज होते मोहिते पाटील समर्थकांनी अकलूज मध्ये बैठक घेऊन शक्ती प्रदर्शन केले । पान २ वर'

## सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी ७७ अर्जदारांनी १२२ अर्ज घेतले

### * सोलापूरसाठी ५८ तर माढा लोकसभा मतदारसंघासाठी ६४ अर्ज घेण्यात आले * सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी दीपक उर्फ श्री व्यंकटेश्र्वरा महा स्वामीजी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

सोलापूर/प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील ४२ सोलापूर(अ. जा.) व ४३ माढा लोकसभा मतदारसंघासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झालेली आहे. आज रोजी सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी एका उमेदवारांनी अर्ज दाखल केला असून ३८ अर्जदारांनी ५८ अर्ज घेऊन गेलेत तर माढा लोकसभा मतदारसंघासाठी ३९ अर्जदारांनी ६४ अर्ज घेऊन गेले गेलेले आहेत, अशी माहिती माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी नामनिर्देशनपत्र घेऊन जाणाऱ्या व्यक्तीचे नांव, फॉर्मची संख्या व पक्षाचे नांव पुढीलप्रमाणे - ०१. श्रीविद्यादुर्गादेवी मौलप्पा करणे (२-अपक्ष) ०२. भन्तेनागमूर्ती मौलप्पा करणे- (२ - अपक्ष) ०३. श्री. शिवाजी चंद्रकांत सोनवणे- (२- अपक्ष) ०४. श्री. व्यंकटेश्र्वरा महा स्वामीजी-(१- भाजपा) ०५. श्री. संभाजी सिद्राम मस्के-(१-परिवर्तन समता पार्टी) ०६. महासिध्द तुकाराम गायकवाड ( १-अपक्ष) ०७. श्री. भारत हणमंतु कंदकुरे( २-अपक्ष) ०८. श्री. अभिमन्यु भानुदास आठवले (१-अपक्ष ), ०९. श्रीमती कल्याणी शंकर हलसंगी (१-भाजपा ), १०. रविकांत रेवप्पा बनसुडे (२-अपक्ष ), ११. ड विक्रम उत्तम कसबे (१-अपक्ष ), १२. राजेश तानाजी खरे (१-महाराष्ट्र विकास सेना पक्ष ), १३. कुमार चंद्रकांत लोंढे (१-बळीराजा पार्टी ), १४. सुर्यकांत सायप्पा व्हनकडे (१-अपक्ष ), १५. अमोल मिलिंद कांबळे (१-अपक्ष ), १६. श्री. कल्लप्पा लिंबाजी मोरे (१-अपक्ष ), १७. रवि सायप्पा म्हेत्रे (२-अपक्ष ) १८. श्री. कुमारगौरव सतीश चंदनशिवे (४-अपक्ष ), १९. श्री. राजरत्न लक्ष्मण फडतरे (४-वंचित बहुजन आघाडी ), २०. श्री. दत्तात्रय विठ्ठल थोरात (३-अपक्ष ), २१. श्री. युगंधर चंद्रकांत ठोकळे (३-अपक्ष ), २२. श्री. नारायणकर राजेंद्र बाबुराव (१-अपक्ष ), २३. नसीर खाजाभाई भाईकट्टी (१-अपक्ष ), २४. रमेश भिमराव शिखरे (१-अपक्ष ), २५. चेतमल नयुमल गोयल (२-अपक्ष ), २६. श्री. सुदर्शन रामचंद्र खंदारे (१-अपक्ष ), २७. श्री. जिवन विलास शिंदे (१-अपक्ष - श्रीदेवी फुलारे), २८. श्री.प्रशांत आप्पाराव बनसोडे (१-अपक्ष ), २९. ड योगेश सुभाष शिदगणे (१-बहुजन मुक्ती पार्टी- श्री. अर्जुन गेना ओहाळ ), ३०. श्री.मचिंद्रनाथ मल्लपा लोकेकर (१-एमआयएम ), ३१. श्री. गंगेश्र्वरी मचिंद्रनाथ लोकेकर (१-एमआयएम ), ३२. श्री. जिवन विलास शिंदे(३-अपक्ष-श्रीदेवी जॉन फुलारे ), ३३. श्री. मल्हारी गुलाब पाटोळे (१-अपक्ष ), ३४. आण्णासो सुखदेव मस्के - (१-अपक्ष), ३५. श्री. मनोहर रेवणसिध्द कोरे (१अपक्ष ), ३६. श्री. संदेश रमेश कांबळे ( १- अपक्ष - प्रज्ञा विष्णू गायकवाड ), ३७. श्री. परमेश्र्वर पांडुरंग गेजगे (१-अपक्ष ),



३८. श्री. शिलवंत तात्याराव काळे ( १- बसपा),

*सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी दीपक उर्फ श्री व्यंकटेश्र्वरा महा स्वामीजी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

माढा लोकसभा मतदारसंघासाठी नामनिर्देशनपत्र घेऊन जाणाऱ्या व्यक्तीचे नांव, फॉर्मची संख्या व पक्षाचे नांव पुढीलप्रमाणे - ०१. श्री. संदीप जनार्दन खरात - (४ - अपक्ष) ०२. श्री. रोहित रामकृष्ण मोरे (३-अपक्ष) ०३. श्री. बाळासाहेब रामकृष्ण मोरे-(१-अपक्ष) ०४. श्री. अजित नामदेव साठे -(१- महाराष्ट्र विकास सेना पक्ष) ०५. श्री. राजेश तानाजी खरे-( १- महाराष्ट्र विकास सेना- श्री.अनिल तानाजी साठे) ०६. श्री. पृथ्वीराज शहाजीराव पाटील-( ०२-अपक्ष) ०७. श्री. पृथ्वीराज शहाजीराव पाटील-(१-अपक्ष (अभिजीत सुखदेव जाधव)) ०८. श्री. पृथ्वीराज शहाजीराव पाटील- (१- अपक्ष (संजय महादेव चव्हाण)) ०९. श्री. जैनुद्दिन दस्तगीर शेख-(१-अपक्ष) १०. श्री. अशोक ज्ञानदेव वाघमोडे-(१-अपक्ष) ११. श्री. सचिन हणमंत गवळी-( १-अपक्ष) १२. श्री. खंडू भिमराव घडे-( १-अपक्ष) १३. श्री. खंडू भिमराव घडे-(१-अपक्ष (श्री. अमोल मधुकर करडे)) १४. श्री. प्रकाश किसन पोळ- (२-आरपीआय (-)/अपक्ष (श्री. संतोष बाळासाहेब बिचकुले)) १५. श्री. गणपत परमेश्र्वर भोसले-(१-अपक्ष) १६. श्री. विजयराज बाळासाहेब माने-देशमुख-(१-अपक्ष) १७. श्री. नवनाथ बिरा मदने-(१-अपक्ष) १८. श्री. प्रभाकरदादा दत्तात्रय जानवेकर-(१-जंग महाभारत संघ) १९. श्री. रमेश नागनाथ बारसकर-( ३-वंचित बहुजन आघाडी) २०. श्री. शिलवंत गुणवंत क्षिरसागर-(२-अपक्ष-श्री. सुधाकर तुकाराम सोनटक्के) २१. श्री. दत्तात्रय विठ्ठल थोरात-( २-अपक्ष) २२. श्री. गिरीश प्रभाकर शेटे(४-अपक्ष) २३. ड नितीन जयसिंगराव खराडे-४-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार (श्री. धैर्यशील राजसिंह मोहिते-पाटील) २४. श्री. गणेश सिध्देश्र्वर भिंगे-( २-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार (श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते पाटील), २५. श्री. मल्हारी गुलाब पाटोळे-(१-आम समाज समता पार्टी ऑफ इंडिया अपक्ष) २६. श्री. खंडू भिमराव धडे-(१-अपक्ष (श्री. अमोल मधुकर करडे), २७. श्री. सुनिल गुंडा जाधव-(२-बहुजन मुक्ती पार्टी) २८. श्री. सिकंदर दादामिया कोरबु-(१-अपक्ष) । पान २ वर


# संपादकीय

## काही नवी बाब नाही.

महाराष्ट्रात एकमेकांविरोधात उभी ठाकलेली महायुती आणि महाविकास आघाडी यांचे अंतिम उमेदवार कोण, याकडे लक्ष लागले आहे. महाविकास आघाडीने यात बाजी मारली आहे. अलीकडे आघाडीने आपल्या ४८ उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली आहे. यात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाला २१, काँग्रेसला १७, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाला १० जागा मिळाल्या आहेत. या यादीवर नजर मारली असता ठाकरे गटच वरचढ ठरल्याचे दिसून येते. या तीन पक्षांचे यापूर्वी कधी पटत नसे. परंतु, दिल्लीतून भाजपची सत्ता उखडून टाकायची या एकाच विचाराने देशातील २७ हून अधिक पक्ष एकत्र आले, त्यात हे तीन प्रमुख पक्ष महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्याचे प्रयत्न चालू होते. या आघाडीला महाराष्ट्रात दोन ते तीन जागा देण्यास आघाडी तयार होती. परंतु, आंबेडकर यांच्या धरसोड वृत्तीमुळे त्यांचे आघाडीशी अद्याप सूत जमताना दिसत नाही. त्यामुळे वंचित आघाडीशिवाय महाविकास आघाडीने आपल्या उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली आहे. कोल्हापूरची जागा काँग्रेसने घेतल्याने ठाकरे गटाने शेजारच्या सांगलीवर दावा ठोकला. परस्पर चंद्रहार पाटलांची उमेदवारी जाहीर केली आणि प्रचारही सुरू केला. याला स्थानिक काँग्रेसजनांकडून विरोध झाला असला तरी सगळे काही ठीक होईल, असा दावा काँग्रेसचे नेते करीत आहेत. ठाणे आणि कल्याणच्या जागेवरून भाजप, शिंदे गटात तू तू मैं मैं चालू असताना दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याणमध्ये शिंदे गटाचे विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे हेच पुन्हा उमेदवार असतील, असे जाहीर करून टाकले. फडणवीस यांनी या जागेची घोषणा करण्यामागे मेख दडली आहे. कारण भाजपला २८ वर्षांनंतर ठाण्याची जागा पदरात पाडून घ्यायची आहे. महायुतीत 'ऑल इज वेल' असे काही चित्र दिसत नाही. साताऱ्याच्या नावाचीही अद्याप घोषणा नाही. त्यामुळे उमेदवारी जाहीर करण्यात भिन्न विचारसरणी असलेल्या नेत्यांच्या महाविकास आघाडीने महायुतीवर आघाडी घेतल्याचे दिसत आहे. वायव्य मुंबईतील ठाकरे गटाच्या अमोल कीर्तिकरांना विरोध करणारे मुंबई प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय निरूपम यांना काँग्रेसमधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. माईक हाती आल्यानंतर विरोधी पक्षांवर यथेच्छ तोंडसुख घेणारे काँग्रेसचे प्रवक्ते राजू वाघमारे यांनी एकनाथ शिंदे यांचा हात पकडला आहे. निवडणुका आल्या की नेत्यांचा 'स्वाभिमान' उफाळून येणे ही काही नवी बाब नाही.

# ३१ मार्च १९९० ला भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन मरणोत्तर सन्मान केले

## ४० वी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.




छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ३१ मार्च १९९० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारत सरकारने भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मान केला होता. याची जाणीव ठेवून त्या कृतीच्या ३४ व्या वर्धापनदिनानिमित्त विचारमंथन व्हावे म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या विद्यमाने ४० व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ३१ मार्च २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते डॉ. आर. डी. बडगे यांनी केले. ते याप्रसंगी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ण व्यवस्थेच्या विरोधातील लढा सुरू केला होता. १९११ ची जनगणना होत असताना गव्हर्नर सी. एस. हटन यांना निवेदन सादर केले होते. ज्यात हिंदू आणि अस्पृश्यांचा देव एक नाही. असे दहा मुद्दे तयार करून अस्पृश्य हे हिंदू धर्माचा भाग नाही हे सिद्ध करून उपेक्षित वर्ग ही संज्ञा प्राप्त करून घेतली. ज्या बळावर गोलमेज परिषदेत आपले हक्क आणि अधिकार मिळवून घेतले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नीतिमत्तापूर्ण व्यथित केले आहे. भारताचे संविधान बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. ५ जून १९५२ ला कोलंबिया विद्यापीठाने एल एल डी तर १९५३ ला उस्मानिया विद्यापीठाने डी. लिट दिली आहे.

अशा अनेक पदव्या मिळवल्या होत्या ज्यामुळे त्यांना सिंबॉल आफ नालेज म्हटले जाते.

या प्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, जयंती निमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन भीम विचारांचा महोत्सव साजरा केला पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, २१ जानेवारी १९५४ ला भारतरत्न या पुरस्काराची योजना स्विकारण्यात आली. १९१३ ला लार्ड मेकाले यांनी सर्वासाठी शिक्षण प्रणाली आणली ज्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांसह अनेकांना शिक्षण घेता आले. माधवराव बागल यांनी बाबासाहेब हयात असताना कोल्हापूरात पुतळा उभारला आहे. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, जयंती निमित्त जमा होण-या पैशाचा ब-याच ठिकाणी नीट वापर होत नाही. अनेक विहारात भंते जी तळ ठोकून बसले आहेत जे धम्म प्रचार करताना दिसत नाही. एड. व्ही. डी. रामटेके म्हणाले की, मेत्ता सिद्धांतानुसार समाजाची पुनर्रचना केली पाहिजे. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय अंतर्भूत असणारे बुद्ध तत्त्वज्ञान बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला दिले आहे. भीमराव



धाकडे म्हणाले की, मान्यवर कांशीराम यांच्या दबावामुळे त्या काळात संसदेत तैलचित्र लावणे, मंडल च्या विरोधातील कमंडल यात्रा रोखने व डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न बहाल करण्यात आले.

प्रमुख वक्ते म्हणाले एड. राजू बागूल म्हणाले की, तीन दशकानंतर दखल घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. जगात आंतरराष्ट्रीय स्तरावर जयंती साजरी करण्याचे प्रस्ताव पास करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारांना केंद्रबिंदू मानले जाते. ज्यामुळे महात्मा गांधींना नोबेल पुरस्कार नाकारण्यात आले आहे. आयडिया आफ जस्टीस आणि लाईट आफ एशिया ही पुस्तके समजून घेतली पाहिजेत.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, मानवीय उत्थानासाठी आवश्यक उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना कुठलाही वंश, व्यवसाय, पद, प्रतिष्ठा, लिंग इत्यादी च्या अनुषंगाने भेदभाव न करता हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्याचे १९५४ पासून सुरूवात करण्यात आली आहे. पहिल्या वर्षी १९५४ ला सी. राजगोपालाचारी, सर्वपल्ली राधाकृष्णन, व सी. व्ही. रमण यांना भारतरत्न हा पुरस्कार देण्यात आला आहे तर १९९० ला जेव्हा डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मरणोत्तर भारतरत्न देऊन सन्मान करण्यात आला त्याच वर्षी दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनाही पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले होते आणि यावर्षी कर्पूरी ठाकूर, लालकृष्ण अडवाणी, पी. व्ही. नरसिंहराव, चौधरी चरण सिंह, एम. एस. स्वामीनाथन यांना पुरस्कार देण्यात आला. अशाप्रकारे आतापर्यंत ५३ व्यक्तींना भारतरत्न पुरस्कार देण्यात आला आहे. जर एम. एस. स्वामीनाथन यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे तर मग त्यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी सरकार का करीत नाही? तसेच भारताचे संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या उपाय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी का केली जात नाही? हे प्रश्न अनुत्तरित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बी. ए., एम. ए., एम. एस्सी., पीएचडी., डीएस्सी, डी. लिट, बार-अँट-ला, सह विविध विषयांत प्राविण्यपूर्ण अति उच्च शिक्षण प्राप्त करून मानवतावादी कार्य केले. ज्यामुळे त्यांना भारतरत्न प्रदान करण्यात आले ही आपल्यासाठी गौरवास्पद बाब आहे. तसेच जागतिक स्तरावर जयंती साजरी करण्याचे प्रस्ताव पास झाल्याने जगभरात जयंती साजरी होणारे हे महनीय व्यक्तीमत्व असल्याने आपण त्यांना विश्र्वरत्न संबोधले पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न बहाल केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने १९९६ ला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार सुरू केला ज्याची सुरुवात २००७ ला करण्यात आली आहे.

हा पुरस्कार आतापर्यंत एस. एम. कृष्णा, नितीशकुमार, आनंद तेलतुंबडे, जोगिंदर सिंग, कांशीराम, शबाना आझमी, पी. एस. कृष्णन, मायावती, प्रकाश आंबेडकर, ऋचा छड्डा, हर्षाली मल्होत्रा, योगी आदित्यनाथ यांना प्रदान करण्यात आला आहे.

या कार्यशाळेला रूपचंद पवार, कारभारी त्रिभुवन, संतोष गडकर, सुधाकर दांडगे, महादेव डांबरे, अजय रमेश बनसोडे, गोविंद कांबळे, डॉ. संघरत्न गवई, दीक्षा कांबळे, साधू आनंद, अनामी मोरे, एड. विलास रामटेके, डॉ. आर. डी. बडगे, प्रज्वलित बनसोडे, राष्ट्रपाल सोनकांबळे, विराज गोविंद कांबळे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

पान १ वरुन

## सोलापूर व माढा लोकसभा..

२९. श्री. नानासो रामहरी यादव( २-अपक्ष) ३०. श्री. सतिष शिवाजी जंगम- (४-भारतीय जनता पार्टी (श्री. रणजितसिंह हिंदुराव नाईक-निंबाळकर), ३१. श्री. गणेश मारुती शेजाळ( १-अपक्ष-श्री. कल्याण मगन बाबर ) ३२. श्री. अमोल मधुकर करडे(२-अपक्ष) ३३. श्री. आण्णासो सुखदेव मस्के(१-अपक्ष) ३४. श्री. नितीन सोपानराव वाघे-(१-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार/राष्ट्रीय आदर्श जनता पार्टी) ३५. श्री. रामचंद्र मायाप्पा घुटुकडे-(१-न्यू राष्ट्रीय समाज पार्टी) ३६. श्री. राघु येताळा घुटूकडे(०१- अपक्ष) ३७. श्री. भाऊसाहेब सुखदेव लिगाडे (०२-अपक्ष) ३८. श्री. गणेश अशोक चौगुले(१-अपक्ष) ३९. श्री. परमेश्र्वर पांडुरंग गेजगे(१-अपक्ष)

## सोलापुरात मोठी घडामोडी..

सोलापूर अक्कलकोट उत्तर सोलापूर मोहोळ या तालुक्यांमध्ये स्वतः लक्ष घालून सर्व सभासदांची एक बैठक कारखान्याच्या मंगल कार्यालयात घेऊन घेणार आहोत आणि त्या बैठकीला आपण भाजपच्या चारी मुंड्या चीत करून प्रणिती शिंदे यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन करणार आहोत असे धर्मराज काळाची यांनी म्हटले आहे

## धैर्यशील मोहिते पाटलांनी दिला..

होते तेव्हापासून मोहिते पाटील हे पोवाडा सोबत जातील अशी चर्चा होते त्यानंतर काल प्रत्यक्षात पुण्यातली भेट झाली त्यामुळे माढा लोकसभा मतदारसंघात भाजपची मोठी डोकेदुखी होणार आहे उद्या १३ एप्रिलला देखील मोहिते पाटील हे अकलूज येथील शरद पवारांच्या उपस्थिती त राष्ट्रवादी पौरा गटात प्रवेश करून होतात तु तरी येत निवडणुकीच्या रिंगणात उतरनार हे आता जवळपास निश्र्चित झाले असे आहे

## अवकाळी पावसाचा मुक्काम..

आहे. तर आग्नेय राजस्थानमधील चक्राकार वाऱ्यांपासून गुजरात, कोकण, कर्नाटक किनारपट्टीपर्यंत हवेचा कमी दाबाचा सक्रिय आहे बुधवारी सायंकाळनंतर बीड, अकोला, बुलडाणा, परभणी या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाने हजेरी लावली. तर गुरूवारी नागपूर येथे पावसाच्या सरी कोसळल्या. दरम्यान, विदर्भ, मराठवाड्यासह राज्याच्या बहुतांश भागात आकाश ढगाळ झाले आहे. अवकाळी पावसामुळे विदर्भात कमाल तापमानातील घट कायम आहे. आज, शुक्रवारी विदर्भातील चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्याला 'ऑरेंज अलर्ट', मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड जिल्ह्याला 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. तर उर्वरित विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे.

## महाराष्ट्रासाठी २ लाख १५ हजार..

निवडणूक यंत्रणेमार्फत प्रयत्न सुरु आहेत.

या वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकांकरिता राज्यातील ४८ मतदारसंघांमध्ये ९ कोटी २४ लाख ९१ हजार ८०६ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. या मतदारांच्या डाव्या तर्जनीवर शाई लावण्याकरिता निवडणूक आयोगामार्फत सुमारे २ लाख १५ हजार ८५० शाईच्या बाटल्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. या सर्व बाटल्या राज्याला प्राप्त झाल्या असून सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. मतदारांच्या तर्जनीवर लावण्यात येणारी आणि काही दिवस न पुसली जाणारी ही शाई म्हैसूर पेंटस् कंपनीमार्फत बनवली जाते.मतदानाचा हक्क बजावल्याची खूण म्हणून सर्वसामान्य असो की लोकप्रतिनिधी अथवा सेलिब्रिटींकडून शाई लावलेल्या डाव्या हाताची तर्जनी अभिमानाने दाखविली जाते. लोकशाही मजबूत करणारी ही काळी रेष निवडणुकांचा अविभाज्य घटक बनली आहे. मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविल्यानंतर त्याला प्रवेश दिला जातो. प्रत्यक्ष मतदानापूर्वीच मतदाराच्या डाव्या तर्जनीवर न पुसली जाणारी शाई लावली जाते. त्यानंतर मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जातो. मतदानापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष (पोलींग ऑफीसर) मतदाराच्या डाव्या तर्जनीवर शाई लावलेली आहे की नाही याची तपासणी करतात. जी व्यक्ती डाव्या तर्जनीची तपासणी करु देत नाही ते मतदानासाठी अपात्र असल्याचे मतदान अधिकारी सांगू शकतात. जर एखाद्या मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसेल तर त्या व्यक्तीच्या डाव्या हातावरील कोणत्याही बोटाला शाई लावली जाते.

## कोलकात्यातून दोघांना अटक

आले, ते खोटी ओळख धारण करून लपले होते अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या दोघांपैकी ताहा हा स्फोटाची योजना आखणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यामागील सूत्रधार होता आणि शाजिबने कॅफेमध्ये 'आयईडी' ठेवले असे अधिकाऱ्यांनी सांगितले. 'एनआयए', केंद्रीय गुप्तहेर संस्था आणि पश्र्चिम बंगाल, तेलंगण, कर्नाटक व केरळ या राज्यांचे पोलीस यांच्या समन्वयाने दोघांना अटक करण्यात आली, अशी माहिती त्यांनी दिली. बंगळूरुमधील आयटीपीएल मार्ग, ब्रुकफील्ड येथे स्थित असलेल्या लोकप्रिय आणि वर्दळीच्या रामेश्र्वरम कॅफेमध्ये १ मार्च रोजी आयईडी स्फोट झाला होता. त्यानंतर ३ मार्चला 'एनआयए'ने याचा तपास आपल्या हाती घेतला आणि दोन संशयितांबद्दल माहितीसाठी १० लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केले. शुक्रवारी दोघांना अटक करण्यात आली.

## भारताची आण्विक शस्त्रास्त्रे नष्ट

देशाला आण्विक सक्षम बनवलं. परंतु, काँग्रेस आपली ती शक्ती नष्ट करण्याच्या विचारात आहे. देशाला प्रश्र्न पडलाय की, नेमकं कोणाच्या सांगण्यावरून इंडी आघाडी आपल्या देशाची आण्विक शस्त्रास्त्रे नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहे.

आपल्या देशाला कमकुवत करण्याचं षडयंत्र रचलं जात आहे. इंडिया आघाडी हे कोणाच्या सांगण्यावरून करतेय?

देशाला कमकुवत कण्याचा कट रचणाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी या निवडणुकीत लोकांनी भाजपाच्या बाजूने मतदान करण्याची आवश्यकता आहे.

मोदी यांनी यावेळी रिफायनरीद्वारे रोजगार उपलब्ध करण्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच ते म्हणाले, काँग्रेस रिफायनरीच्या विरोधात आहे.

ते रिफायनरीच्या कामात अडथळे आणत आहेत. परंतु, मी आश्र्वासन देतो की मी माझ्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात स्वतः इथे येऊन रिफायनरीचं उद्घाटन करेन.

# आसाममध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, चीनच्या सीमेवर २१ पॅरा स्पेशल फोर्समध्ये अनावरण

वाई : साताऱ्यातील एका सुपुत्राने जम्मू काश्मीरात भारतीय सैन्य दलाच्या केंद्रात सर्वप्रथम उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यानंतर आता आसाममध्ये सैन्य दलाच्या केंद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्र्वारूढ पुतळा उभारला असून, त्याचे नुकतेच अनावरण झाले आहे. ही बाब सातारा जिल्ह्याच्या दृष्टीने अभिमान व गौरवाची ठरली आहे.



भोसे (ता. कोरेगाव) येथील लेफ्टनंट कर्नल अमित विजय माने यांनी पुढाकार घेत आपल्या सहकाऱ्यांसह जम्मू काश्मीरात कुपवाड्यामध्ये ४१ राष्ट्रीय रायफल्स (मराठा लाईट इन्फंट्री) बटालीयनमध्ये सात नोव्हेंबर २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आहे. त्याचे अनावरण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आदींनी तेथे जाऊन समारंभपूर्वक केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या स्वराज्याचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या नागठाणे (ता. सातारा) येथील रविराज नलवडे यांनी पुढाकार घेत आसाममध्ये सैन्य दलाच्या केंद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्र्वारूढ पुतळा उभारला आहे.

चीनच्या सीमेवर आसाममधील जोहाट येथे भारतीय सैन्य दलाच्या २१ पॅरा स्पेशल फोर्स मराठा २१ युनिटचे कमान अधिकारी कर्नलपदी रविराज नलवडे (सेना मेडल) हे कार्यरत आहेत. त्यांनी व पूर्वोत्तर सीमेवर संरक्षणार्थ तैनात असलेल्या मराठासह इतर युनिटमधील अधिकारी, जवानांनी एकत्र येत शिवाजी महाराजांचा अश्र्वारूढ पुतळा उभारण्याचा संकल्प केलेला होता. त्यानुसार सर्वांनी स्वनिधीमधून पुतळा आणून, संरक्षक दलाची परवानगी वगेरे बाबी पूर्ण करून युनिटमध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आहे. या पुतळ्याचे अनावरण नुकतेच लेफ्टनंट जनरल हरजितसिंग साही यांच्या हस्ते झाले. त्यांनी प्रथम रविराज नलवडे यांचा पुढाकार व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुतळा उभारणीतील यशस्वी योगदानाचे कौतुक केले. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पुतळा जवानांना मात्रभूमीचे रक्षण करण्याची सतत प्रेरणा देईल असा विश्र्वास व्यक्त केला. यावेळी श्री. नलवडे, २१ पॅराचे पाहिले कमान अधिकारी व्ही. बी. शिंदे, आजी माजी अधिकारी, सैनिक उपस्थित होते. आसामध्ये उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्र्वारुढ पुतळ्यामुळे भारतीय सैन्य दलात कार्यरत अधिकारी, जवानांना जशी प्रेरणा मिळेल तद्वतच पुतळ्यामुळे शत्रूवर कायम दहशत राहील. - हरजितसिंह साही, लेफ्टनंट जनरल

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अनेक पैलूवर निबंधातून विद्यार्थ्यांनी मांडले विचार...!

## महामानवापासून घेतली प्रेरणा : नंगपूरा-मुर्री निवासी शाळेचा उपक्रम



गोदिंया : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निमित्त विभागाच्या सूचनेप्रमाणे सामाजिक सप्ताह साजरा करत असताना अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अनेक पैलूवर स्वतः च्या हाताने निबंधातून आपले विचार मांडले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यात सुरू असणाऱ्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय अंतर्गत चालणारी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथील वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त निबंध स्पर्धा यामध्ये सहभाग घेतला. शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या मार्गदर्शनात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक पटलावर वैचारिक निबंध लेखन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्य, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकारण, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानावरील विचार, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे धार्मिक विचार, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची वकीली, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विदेशातील शिक्षण, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे युवकावरील विचार आदी विषय तज्ञांनी करुन मार्गदर्शक शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी निबंध लिहून वैचारिक चिंतन मांडले आहे.

यामध्ये अनामिक दुर्योधन, योगेश डोंगरे, सावन जाधव, अमोल शहारे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट आपल्या प्रतिभा शक्तीच्या जोरावर विचार निबंधातून मांडले. ही शाळा अनेक उपक्रम राबवत असते. अनेक गोष्टीवर समाजाला आपल्या उपक्रमातून सामाजिक संदेश देण्याचे नेहमी मानस असतात. विद्यार्थ्यांचा संर्वागिण विकास हेच ध्येय आहे.

# निफाड येथे उपजिल्हा रुग्णालयात उष्णघात कक्ष स्थापन

निफाड/प्रतिनिधीः सध्या वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे सध्या पृथ्वीचे तापमान वाढत आहे मागील काही दिवसांपासून उष्णतेचे प्रमाण अधिक वाढलेले असल्याने मा. जिल्हा शल्यचिकित्सक नाशिक डॉ चारूदत्त शिंदे व निवासी वैद्यकीय अधिकारी, डॉ. संदीप सुर्यवंशी, यांच्या आदेशनुसार तसेच उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे मा डॉ राजीव तांभाळे,वैद्यकीय अधिक्षक,उपजिल्हा रुग्णालय निफाड यांच्या मार्गदर्शनानुसार उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे उष्माघात कक्ष स्थापन करून त्यात ५ बेड हे राखीव ठेवण्यात आले आहे

उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील वैद्यकिय अधिक्षक,डॉ राजीव तांभाळे यांनी उष्माघात बाबत माहिती सांगताना सांगितले की, वातावरणाचे तापमान ३७% डिग्री सेल्सिअस असते तो पर्यंत मानवाला त्याचा काहीही त्रास होत नाही. मात्र यापेक्षा जास्त तापमान असल्यास त्यांचा मानवाच्या शरीरात त्रास होऊ शकतो तसेच तापमान आणि आद्रता यांचा मिळून होणारा परिणाम अधिक असतो असेही नमूद केले.

उष्णतेच्या लाटेचा कोण कोणत्या व्यक्तींना जास्त प्रमाणात अधिक त्रास होऊ शकतो ते पुढीप्रमाणे उन्हात कष्टांची काम करणाऱ्या लोकांना, वृद्ध व लहान मुलांना, स्थूल लोकांना, पुरेशी झोप न घेणाऱ्या लोकांना, गरोदर महिलांना, अनियत्रित मधुमेह व हृदयरोग रुग्णांना व दारूच्या व्यसनी लोकांना त्रास होऊ शकतो

**उष्णतेचे लक्षणें** १) कातडी लालसर होणे २) ताप व डोके दुःखने ३) खुप घाम येणे ४) खुप थकवा येणे ५) चक्कर व उलटी येणे या प्रकारचे लक्षणें आढल्यास तात्काळ जवळील सरकारी दवाखन्यात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले

**उष्माघात मध्ये काय करावे** १) पुरेसा पाणी प्या २) प्रवासात पाणी सोबत ठेवावे ३) हलक्या वजनाचे फिकट रंगाचे सैलसर कपडे वापरा ४) उन्हात जातांना टोपी/टोपी खाली ओलसर कपडा ठेवा ५) ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा

**उष्माघात मध्ये हे करु नये** १) शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे टाळावे २) कष्टांची कामे उन्हात करु नये ३) गडद रंगाचे व तंग कपडे घालू नये ४) मद्य, चहा, कॉफी व सॉफ्ट ड्रिंक टाळा ५) शिळे अन्न खाऊ नये तसेच माणसासोबत पक्षी, प्राणी व वनस्पती यांची ही काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

# प्रा.एस.जी.उफाडे यांना पीएच.डी पदवी प्रदान



निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय निफाड येथील मराठी विभाग प्रमुख श्रीमती. सुनिता उफाडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठाची विद्यावाचस्पती ( पीएच.डी) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी अरुण साधू यांच्या कादंबरीतील स्त्री पुरुष व्यक्तिरेखा चित्रण: एक अभ्यासया विषयावर आपला शोध प्रबंध सादर केला.

या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. अरुण कोळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी केलेल्या संशोधनाबद्दल ॲड. नितीन ठाकरे सरचिटणीस मविप्र, मविप्र चे सभापती बाळासाहेब क्षीरसागर , संचालक प्रवीण नाना जाधव, शिवाजी गडाख , कृष्णाजी भगत , मविप्र महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के शिंदे, प्राचार्य.डॉ. एस. व्ही. जाधव तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवकसहकारी यांनी त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नळदुर्ग येथे नगर परिषदेत राष्ट्रपिता महात्मा फुले यांची जयंती साजरी



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडेः नळदुर्ग नगरपालिकेत दि.११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. दि.११ एप्रिल रोजी सर्वत्र क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

नळदुर्ग येथे ही नगरपालिका कार्यलयात क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक सुधीर हजारे, भाजपचे शहर अध्यक्ष धीमाजी घुगे, मनसेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी, रिपाईचे शहर अध्यक्ष मारुती खारवे, विकास सोसायटीचे संचालक रघुनाथ नागणे,

सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव, अमर भाळे,शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, पत्रकार विलास येडगे, तानाजी जाधव, उत्तम बनजगोळे, दादासाहेब बनसोडे,न.प.चे कर्मचारी खंडू नागणे, शहाजी येडगे आदीजन उपस्थित होते.

# येडोळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी अध्यक्षपदी सुरेश लोंढे तर उपाध्यक्षपदी सुरत गायकवाड

वागदरी/एस.के.गायकवाडः तुळजापूर तालुक्यातील मौजे येडोळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती उत्सव कमिटी अध्यक्षपदी पदी सुरेश लोंढे तर उपाध्यक्षपदी सुरज गायकवाड यांची व सचिव पदी देवानंद लोंढे आदींची सर्वानुमत्ते निवड करण्यात आली.

येडोळा येते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त एक बैठक संपन्न झाली असून या बैठकीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी निवडण्यात आली.सर्वानुमते चर्चा करुन जयंती उत्सव कमिटी अध्यक्षपदी सुरेश लोंढे,उपाध्यक्ष पदी सुरज गाायकवाड व सचिव पदी देवानंद लोंढे आदींची निवड करण्यात आली असून जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळीअंकुश लोंढे,अर्जुन लोंढे,लक्ष्मण लोंढे,प्रविण कांबळे, अमीत लोंढे,गोवर्धन लोंढे,आभिषक लोंढे,भानुदास लोंढे,महेस लोंढे,डॉ.सुरज लोंढे,व्यंकट लोंढे,अमर जेटीथोर सह कार्यकर्ते उपस्थित होते.



# प्रणिती शिंदेंसाठी लिंगायत समाजाचा पुढाकार

## सभासदांनों माझ्यावर झालेल्या अन्यायाचा बदला या निवडणुकीत घ्या ; धर्मराज काडादी यांचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापुरातील श्री सिद्धेश्र्वर परिवारातील वीरशैव लिंगायत समाजाच्या प्रमुख मान्यवरांची बैठक सिद्धेश्र्वर साखर कारखान्याचे मार्गदर्शक धर्मराज काडादी यांनी आयोजित केली होती. प्रारंभी सुरेश हसापुरे यांनी प्रास्ताविक केले.



या बैठकीस कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार विश्र्वनाथ चाकोते, जागतिक लिंगायत महासभेचे कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, अमर पाटील, केदार उंबरजे, अशोक पाटील, माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, शिवयोगी शास्त्री हिरेमठ, सिध्दाराम चाकोते, शंकर पाटील, रामदास फताटे, अनिल सिंदगी, हरिष पाटील, रमेश बावी, पशुपती माशाळ, सकलेश बाभूळगावकर, बिपिन करजोळे, सिद्धेश्र्वर साखर कारखान्याचे कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक बिराजदार, राजशेखर म्हमाणे, यांच्यासह सिद्धेश्र्वर साखर कारखाना, सिद्धेश्र्वर देवस्थान, सिद्धेश्र्वर शिक्षण संस्था, सिद्धेश्र्वर बाजार समिती पदाधिकारी सह समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काडादी म्हणाले, आमदार प्रणिती शिंदे यांच्या अंगात धमक आहे, चिमणी पाडल्यानंतर लगेच त्या साखर कारखाना स्थळावर येऊन त्यांनी पाहणी केली. सर्व कामगारांना धीर दिला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, उत्तर सोलापूर, मोहोळ अशा पाच तालुक्यांमध्ये सिद्धेश्र्वर कारखान्याचे सभासद आहेत मी स्वतः लक्ष घालून सर्व तालुक्यात फिरून एक बैठक कारखान्याच्या मंगल कार्यालयात सभासदांचे घेणार आहे. त्या बैठकीत मी सभासदांना आवाहन करणार आहे की, ज्यांनी मला त्रास दिला, कारखान्याची चिमणी पाडून हजारो शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त केले अशा भाजपला चारी मुंड्या चित करा आणि प्रणिती शिंदे यांच्या पाठीशी राहा. प्रणिती शिंदे यांनी सभागृहात सुद्धा आपल्या चिमणीचा विषय वेळोवेळी मांडून धारेवर धरले होते, सुशीलकुमार शिंदे यांनीही

यात्रेवेळी रस्त्याच्या विषयी स्वतः मंत्रालयात येऊन मुख्यमंत्र्यांशी बैठक घेऊन हा विषय मार्गी लावला होता. सुशीलकुमार शिंदे म्हणाले, मी ही वीरशैव कक्कय्या समाजाचा आहे, आणि काडादी यांनी डेरीग करुन उघड उघड मिटींग घेऊन पाठींबा दिल्याबद्दल मी त्याचा जाहिर आभार मानतो. प्रणितीताई जिद्दी आहे, काम करते, जात पात बघत नाही तिला साथ द्या असे शिंदे म्हणाले.

# रमजान ईद हा बंधू भावाचा व मानवतेचा संदेश देणारा सण : आ बाळासाहेब थोरात



संगमनेर/प्रतिनिधीः रमजान ईद हा पवित्र सण एक महिन्याच्या उपववासांतर येतो जगामध्ये मुस्लिम बांधव मोठ्या आनंदाने आणि पवित्र भावनेने करत असतात.

एकता ही भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य असून रमजान ईद हा बंधुभावाचा संदेश देणारा सण असल्याचे प्रतिपादन कांग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते तथा मा महसूल मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.✲ ईदगाह मैदान येथे रमजान ईद निमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देताना ते बोलत होते यावेळी समवेत मा आ डॉ सुधीर तांबे आ सत्यजित तांबे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते. आणि शुभेच्छा देताना आमदार थोरात यांनी म्हणाले की, उपवास हा देणारा परमेश्र्वर जवळ जाण्याचा मार्ग आहे उपवसांने जीवनातील पवित्रा वाढते रमजान महिना हा आनंददायी व प्रेरण आहे ,भारतीय संस्कृतीमध्ये विविधता असून सर्व धर्म समभावामुळे सर्व नागरिक एकमेकांचे सण आनंदाने साजरा करतात मा आ डॉ तांबे म्हणाले की, रमजान महिना हा परमेश्र्वर जवळ राहण्याचा उपवास हा मार्ग असुन अंतकरणाच्या शुद्धीसाठी पवित्र उपवास केले जातात ईद निमित्ताने सर्व बांधवांना त्यांनी शुभेच्छा दिल्या,आमदार सत्यजित तांबे यांनी म्हणाले एकात्मता ही भारतीय संस्कृतीची मोठी ताकद असून सर्वजण एकत्र येऊन मोठ्या उत्साहाने साजरा करत आहे, यावेळी संगमनेर शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते या प्रसंगी सर्व मान्यवरांनी त्यानां शुभेच्छा दिल्या

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात महात्मा फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी केले अभिवादन



अक्कलकोट /प्रतिनिधी : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग, तसेच क्रीडा विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी , पुनम कोकळगी, रूपाली शहा, मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य- मलकप्पा भरमशेट्टी , प्राचार्य- डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ. बाळासाहेब पाटील, अशोक हंद्राळ आदी प्राध्यापक उपस्थित होते. तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करा; जिल्हाधिकाऱ्यांचे नवमतदारांना आवाहन

पुणे : नवमतदारांनी लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात उत्साहाने सहभागी व्हावे आणि प्रथम मतदान करून हा उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्यावतीने आयोजित युवक मेळाव्यात सहभागी युवकांशी दूरदृष्यप्रणालीद्वारे डॉ.दिवसे यांनी संवाद साधला. यावेळी उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे, तहसिलदार राधिका बारटक्के उपस्थित होते.डॉ.दिवसे म्हणाले, मतदानाद्वारे आपण चांगले प्रतिनिधी निवडूण देवू शकतो. देशाचे भविष्य असलेल्या युवकांनी या प्रक्रियेत सहभाग वाढविणे गरजचे आहे. नवमतदारांची नोंदणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने वर्षभरात अनेक उपक्रम राबविले आहे. तरीदेखील जिल्ह्यातील युवकांच्या लोकसंख्येच्या तुलनेत केवळ २५ ते ३० टक्के मतदारांनी मतदार नोंदणी केली आहे.

पुणे, शिरुर आणि मावळ लोकसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी करून इच्छिणाऱ्या युवकांसाठी १५ एप्रिल रोजी रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणी करण्याची संधी आहे. युवकांनी निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ https://voters.eci.gov.in किंवा वोटर हेल्पलाईन पवर आपल्या जागेवरच मतदार नोंदणी करण्याची सुविधा आहे. मतदार नोंदणीसाठी केवळ रहिवासी आणि वयाचा पुरावा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

वयोवृद्ध मतदारांचा आदर्श समोर ठेवा

जिल्हाधिकारी म्हणाले, लोकशाही बळकट करण्यात वयोवृद्ध मतदारांचे मोठे योगदान



आहे. जिल्ह्यात ८५ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या मतदारांना द्यावयाच्या सुविधेबाबत त्यांच्याशी संपर्क केला असता मतदान केंद्रावर अभिमानाने मतदान करण्याची इच्छा अधिकांश ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली. त्यांच्या या कर्तव्यभावनेचा आदर्श युवकांनी समोर ठेवावा आणि मतदार नोंदणी तसेच मतदानात सहभाग घ्यावा. महाविद्यालयाच्या विविध उपक्रमातदेखील उत्साहाने सहभागी होऊन नेतृत्वगुण आणि संवादकौशल्य विकसित करावे. समाज माध्यममांचा उपयोग सकारात्मकता निर्माण करण्यासाठी करावा आणि आपल्या सहभागातून समाज आणि देश समृद्ध करावा, असे आवाहन त्यांनी केले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाने लोकशाही व्यवस्था स्वीकारली. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ओळख आहे. अनेक देशात महिलांना मताधिकारासाठी लढा द्यावा लागला, मात्र भारताने स्वातंत्र्यानंतर संविधानाद्वारे महिलांना मताधिकार प्रदान केला. अशा लोकशाही व्यवस्थेत निवडणुकीला महत्व असताना पुण्यासारख्या शहरी भागात राज्यात होणाऱ्या सरासरी मतदानापेक्षा कमी मतदान होते. लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान करणे महत्वाचे आहे, असेही श्री.दिवसे म्हणाले.

# अक्कलकोट येथील ईदगाह मैदानावर ईदऊल फितरची सामुदायिक नमाज पठण




अक्कलकोट/प्रतिनिधीः ईदऊल फितर अर्थात रमजान ईद उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.ईदच्या या पवित्र दिवशी आपल्या देशातील सामाजिक सलोखा, बंधुभाव, एकमेकांच्या धर्माबद्दल प्रेम,अधिकाधिक वृद्धिगत वाहवा अशी प्रार्थना ही करण्यात आली.

यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांनी अक्कलकोटच्या शाही ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज पठण केले.यावेळी नमाज पठनानंतर एकमेकांची गळा भेट घेत ईदच्या शुभेच्छा देखील यावेळी देण्यात आल्या.अक्कलकोट ईदगाह कमिटी कडून नमाज पठण करण्यासाठी आलेल्या मुस्लिम बांधवांना वजू करण्यासाठी पाण्याची व्यवस्था,पिण्यासाठी पाण्याचे बॉटल,नमाज पटनासाठी उत्तम चटाया अंथरण्यात आले होते, वयस्कर लोकांना नमाज पठण करण्यासाठी सावलीची व खुर्च्यांची सोय करण्यात आली होती,हे सर्व उत्तम सोय ईदगाह कमिटी कडून करण्यात आली होती.

ईदऊल फितर अर्थात रमजान ईदची नमाज पठण झाल्यावर ईदगाह येथे विविध राजकीय व सामाजिक नेते मंडळी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.या वेळी माझी गृहराज्यमंत्री सिद्धारामजी मेहित्रे साहेब, आमदार सचिन दादा कल्याणशट्टी,अशपाक भाई बळोरगी,रईस टिनवाला,एजाज मुतवली,महेश हिंडोळे, दिलिप भाऊ सिद्धे, सद्दाम शेरिकर,ननु कोरबु,मैनोदीन कोरबु,अविनाश मडीखांबे, वकील बागवान, रजाक सय्यद,अलिबाशा अत्तार,अकील बागवान,सलीम यळसंगी,हारून जमादार, मोशीन मोकाशी,सोहेल फरास आदी मुस्लीम बांधव उपस्थित होत.

# श्री कमलादेवी चरणी चांदीचे गंगा व तांब्या अंदाजे साडेतीन किलो वजनाचे वस्तुरूप देणगी



पंढरपूर/ प्रतिनिधीः श्री जगदंबा कमलादेवी मंदिरामध्ये श्री कमलादेवी चरणी चांदीचे गंगाळ व चांदीचा तांब्या अंदाजे साडेतीन किलो वजनाची वस्तू देणगी रामचंद्र माने खिंडी तालुका करमाळा यांच्याकडून अर्पण करण्यात आले आहे दिगंबर दत्तात्रय देशमुख या करमाळा यांच्याकडून ११०००/-(अकरा हजार) धनादेश चेक बाळासाहेब काशिनाथ फंड रा करमाळा यांच्याकडून २००१/-रुपये त्रिंबक गोविंद घाडगे १००१/-ऑनलाइन सोहम जयवंत कुलकर्णी रा. करमाळा १००१/-हरिभाऊ गणपतराव नलावडे रा. कामुने रोख यांच्याकडून १००१/-त्यानिमित्त मंदिर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.मंदिर समितीचे अध्यक्ष सोमनाथ चिमटे सचिव अनिल पाटील विश्र्वस्त सुशील राठोड डॉक्टर प्रदीप कुंभार जाधव पाटील डॉक्टर महेंद्र नागरे अँड शिरीष कुमार लोणकर राजेंद्र वशिंबेकर पुरोहित सुशील पुराणी रविराज पुराणिक पुजारी दादासाहेब पुजारी ओंकार पुजारी सचिन सोरटे किसान आप्पा सोरटे नारायण सोरटे प्रशासनाधिकारी महादेव भोसले व्यवस्थापक अशोक साठे इत्यादी उपस्थित होते

# थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आ. प्रणिती शिंदेचे अभिवादन



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने स्त्री शिक्षणाचे जनक थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली या निमित्ताने सोलापूर लोकसभेचे महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणितीताई शिंदे यांनी सोलापुरातील महात्मा फुले महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यात पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

यावेळी बोलताना प्रणिती शिंदे म्हणाले की महात्मा फुले हे एक लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते थोर विचारवंत समाजसुधारक आणि लेखक होते त्यांनी सामाजिक प्रबोधन अतिव्यवस्थेची निर्मूलन आणि स्त्री शिक्षण अशी समाजाला विकासाची दिशा देणारे विधायक काम केले आहेत

महात्मा फुले यांनी बहुजन समाजाचा उद्धारासाठी आपली संपूर्ण आयुष्य खर्च घातले स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली व शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिळवणुकीला वाचा फोडली तसेच सप्तशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजिक गुलामगिरी विरुद्ध आवाज उठवला त्यांचे कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारी असल्याची विचारही शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले आहे

यावेळी प्रणिती शिंदे आणि सोलापूर शहरातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा गौरव करत शहरात एक पूर्णाकृती पुतळा उभारून फुले यांच्या कार्याला साजेशी असे स्मारक निर्माण करण्याचा मानस व्यक्त केला

यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन भाऊ नरोटे राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुदीप खराडमल माजी महापौर नलिनी शिंदे माजी नगरसेवक मनोज गुरुवार विनोद भोसले शंकर पाटील तिरुपती प्रखिन पंडाल पंडित सातपुते अनंत महात्रे भीमाशंकर टेकाळे दिगंबर मेटकरी गोवर्धन सिंचन सूर्यकांत शेरखानी राहुल बळकोटे विडी गायकवाड यांच्यासह इतर मान्यवर इत्यादी उपस्थित होते

# चैत्री यात्रेनिमित्त पंढरपुरातील वाहतूक मार्गात बदल

पंढरपूर/प्रतिनिधीः येत्या १९ एप्रिल २०२४ रोजी होणाऱ्या चैत्री यात्रेनिमित्त पंढरपूर शहरातील तसेच शहरा बाहेरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा बदल १७ ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीपर्यंत राहणार आहे. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

पंढरपूर शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांना सूचना:- पंढरपूरात यात्रे निमित्त नगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने करकंब क्रॉस रोड , (अहिल्यादेवी चौक) शेटफळ चौक मार्ग विसावा येथे पार्क करावीत. ६५ एकर येथे फक्त दिंडी व पालखीचे वाहने पार्क करावीत. पुणे,सातारा,वाखरी,मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळी बायपास मार्गे येवून वेअर हाउस येथे पार्क करावीत. तसेच विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने टाकळी बायपासमार्गे वेअर हाऊस व यमाई तुकाई मंदीर येथे पार्क करावीत.

पंढरपूर शहरातून बाहेर जाणाऱ्या वाहनांबाबत सूचना:- पंढरपूर शहरातून टेंभुर्णी,नगर,सोलापूर,लातूरकडे जाणाऱ्या सर्व वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका,कॉलेज क्रॉस रोड,करकंब चौक मार्गे जातील. पुणे-साताऱ्याकडे जाणारी वाहने सरगम चौक, कॉलेज क्रॉस रोड वाखरी मार्गे जातील तर विजापूर,कराड,आटपाडी, कोल्हापूर,सांगली,मिरज,मंगळवेढा मार्गे जाणा-या सर्व गाड्या सावरकर चौक, नवीन कराड नाका येथून टाकळी बायपास व गादेगाव फाटा मार्गे जातील.

पंढरपूर शहरातीलअंतर्गत वाहतुकीबाबत:- १७ ते २० एप्रिल २०२४ पर्यंत प्रदक्षिणा मार्ग ,महाव्दार चौक ते शिवाजी चौक,सावरकर चौक ते शिवाजी चौक मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद असेल. बार्शी, सोलापूर मार्गावरुन येणारी तीन रस्तामार्गे येणारी हलकी वाहने फक्त अंबाबाई पटांगणात उतरतील. नियमित ट्रक व यात्रेसाठी सोडण्यात येणाऱ्या एस.टी. बसेसना जुना दगडी पुल, नवीन पुल व तीन रस्ता मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा नाका, महात्मा फुले चौक , लहुजी वस्ताद चौक या मार्गाने येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंदी आहे. अंबाबाई पटांगण ते भजनदास चौक, अंबाबाई पटांगण ते अर्बन बँक, शिवाजी चौक ते अर्बन बँक, संकुल कार्नर ते नगरपालिका भक्ती मार्ग ते काळा मारुती चौक हा मार्ग पासेसच्या वाहना व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या वाहनासांठी बंद ठेवण्यात येणार आहे.

पार्किंग व्यवस्था सूचना :- अहमदनगर,बार्शी,सोलापूर,मोहोळकडून येणारी वाहने आहिल्या चौक, तीन रस्ता मार्गे मोहोळ रोड विसावा व नगरपालिकेच्या वाहनतळावर पार्किंग करतील. तसेच ६५ एकर येथे दिंडी व पालखीची वाहने पार्कींग करतील.

पुणे,सातारा,वाखरी,मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर,सांगली,मिरज,सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळी मार्गे येवून वेअर हाउस येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढाकडून येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी मार्गे वेअर हाऊस येथे पार्कींग करावीत. यात्रा कालावधीत शहरात येणारी हलकी वाहने अंबाबाई पटांगण, गजानन महाराज मठ, नगरपालिका पार्कींग, क्रीडा संकुल तसेच संबधीत मठामध्ये पार्क होतील शहरातील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी गाड्या पार्क करण्यास मनाई असेल.

एकेरी मार्ग:- कॉलेज क्रॉस रोड ते सरगम चौक ते सावरकर चौक ते नवीन कराड नाका यामार्गावर एकेरी वाहतुक राहील.

संबधित भाविकांनी व वाहनधारकांनी या बदलेल्या वाहतूक मार्गाची नोंद घेऊन वाहतूक कोंडी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन श्री. सरदेशपांडे यांनी केले आहे.

# सैनिक टाकळीच्या संजीवनी देसाई यांना राजमाता जिजाऊ आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान



सैनिक टाकळी/संजय चव्हाणः सैनिक टाकळीच्या संजीवनी प्रकाश देसाई यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा कोल्हापूर यांच्यामार्फत राजमाता जिजाऊ आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ चा प्रधान सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# सातपुतेंना मत म्हणजे मोदींना मत : आ.कल्याणशेट्टी



अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्यासह देशाचा सर्वांगीण विकास करण्याचा ध्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतला आहे. महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना मत म्हणजे भारताचे विकासपुरुष मोदी यांनाच मत आहे, असे सांगताना अक्कलकोटच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारकडून आतापर्यंत कोटच्यवधींचा निधी मिळाला असल्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले. गुरुवारी, महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ पानमंगरूळ येथे झालेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उमेदवार आमदार राम सातपुते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील, डॉ. अशोक हिप्परगी, भाजपचे तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, उपाध्यक्ष परमेश्वर यादवाड, शिवसिध्द बुळ्ळा, पान मंगरुळच्या सरपंच रत्नाबाई महाजन आदी उपस्थित होते. तत्पूर्वी सातपुते यांच्यावर पुष्पवर्षाव करीत फटाक्यांच्या आतषबाजीत ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, काँग्रेसच्या काळात २७ वर्षांपासून रखडलेल्या पाण्याच्या योजनेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी दिला.

शेकडो कोटी रुपये खर्चून गावागावांमध्ये रस्ते तयार केले. श्रीरामांचे मंदिर आणि गरिबांना घरे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या काळातच झाली आहेत. त्यामुळे नरेंद्र मोदींना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. आमदार सातपुते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब जनतेच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचे काम केले. मोदींनी गरिबांना गॅस, घर, शौचालय, शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये, आयुष्मान भारत योजनेतून ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिले. मी ऊसतोड कामगाराचा मुलगा आहे. संघर्षातून यश मिळवले आहे. त्यामुळे सोलापूरकर माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. परमेश्वर यादवाड यांनी प्रास्ताविक केले. येथील सभेनंतर सुलेरजवळगे, चिंचोळी, केगाव, कुमठा, कोर्से गाव, मुंढेवाडी, कल्लकर्जाळ, धारसंग, शेगाव, आळगे, तडवळ, करजगी या गावांना भेटी देऊन तेथील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी सर्व गावांमध्ये नागरिकांनी जोरदार स्वागत केले. याप्रसंगी अक्कलकोट विधानसभा प्रमुख राजकुमार झिंगाडे, मल्लिकार्जुन बिराजदार, महादेव मुडवे, विशाल दारफळे, श्रीशैल आहेरवाडी, गुरुपुत्र गदगे, दरेप्पा अरवत, पंचप्पा चरटे, काशीनाथ कोडते, लक्ष्मण पाटील, संतोष पाटील, बाबूराव पाटील, मल्लिकार्जुन पाटील, शिवयोगी स्वामी, अशोक मानशेट्टी, बाबुशा कोरपे, गुरू मुडगी, हिंडोळे आदी उपस्थित होते.